नही ज्ञानेन सदृश्यम पवित्रमिह विधते

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ वडूजचे

कला व वाणिज्य महाविदयालय

वडूज

मराठी विभाग

विषय – काव्यशास्त्र

विदयार्थ्यांची नावे

१.श्रीराम पोपट तुपे

२.गेरखनाथ किसन इंगळे

३.अक्षय वासुदेव शिंदे

४.प्रियंका दिपक काळे

पर्यवेक्षक

प्रा. सौ केंजळे सविता

अधिव्याख्याती

कला व वाणिज्य महाविदयालय वडूज शैक्षणिक वर्ष २०१९–२०

ARTS & COMMERCE COLLEGE Tal.Khatav Dist.Satara VADUJ

मराठी विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय,
वडूज,ता.खटाव,सातारा

Scanned with CamScanner

## प्रकल्प विषय

आपल्या परीसरातील एखादया कवीची मुलाखत घ्या आणि त्यांना कविता कशी सुचते या विषयावर चर्चा करा.

Scanned with CamScanner

तुमचे नाव सांगुण तुमचा परिचय करुन दया

आराधना संतोष गरव

मु पो वडूज ता खटाव जि सातारा

मो नं ८४२१५०८७६१

जन्म तारीख ५/४/१९८१

शिक्षण एम ए डी.एड

ओळख : बालकवी आराधना गुरव

Scanned with CamScanner

**२. तुम्हाला आत्तापर्यंत कोणकोणते पुरस्कार प्राप्त झालेले आहेत**

१.राष्टीय शिक्षकरत्न शिर्डे

२. स्वदेशी भारत सन्मान फलटण

३.माणदेशी रत्न दहिवडी

४ वारणेचा वाघ पन्हाळा

**३.आत्तापर्यंत तुम्ही कोणकोणती पुस्तके वाचली आहेत**

छावा कादंबरी नाटय सम्राट नाटक रामायण,भगवतगिता, फकीरा कांदबरी, तसेच बेगवेगळी नाटके विनोदी पुस्तके गोष्टींची पुस्तके वाचली आहेत

**४ कोणकोणती साहित्य प्रकाशनाच्या वाटेवर आहेत**

कधीकधी काव्यसंग्रह लिहला आहे हस्तप्रकाशन वर्तुळे राज्य गृह मंत्री दुसरा काव्यसंग्रह आहे

**५. लिखान नियीमत रोज करता का ?**

हो लिखान रोज नियीमत करते कारण लिखान केल्याशिवाय जमतच नाही रोज दिवसभरात विचार डोक्यात येतात ते ते विचार मी वहीच्या पानावर रोज रात्री लिहते रोज एखादी वेगळी कवीता मनामध्ये घोळते

**६.लिखानाची वेळ कोणती आहे**

रोज रात्री जेवण झाल्यानंतर मी शांत वातावरणाच्या वेळी मी ती लिखान करते सांगतात जेवताना ९.३० लिखानासाठी मी बसते

तसेच २००१ पासून विवीध कवीता लिहण्यास सुरवात केली

वेगवेगळया सुचना—या कवीता व्यवस्थीत एखादया कागदावर लिहून त्या संग्रह करण्यास सुरवात केली जे मनात येईल ते अशा प्रकारे लिखानाचा प्रवास सुरु झाला कवीता संग्रह उदयास आला त्या ७१ कवितांचा समावेश आहे

Scanned with CamScanner

**७.लिखासाठी तुम्हाला तुम्हाला प्ररणा काणाकडून मिळाली**

कथा क्षेत्रामध्ये कै अण्णा भाउ साठे कै म.भा. भोसले गुरुजी धनगाव

त्याचबरोबर अण्णासाहे थोर झाकले हिम्मत पाटील नागठाणे पाटील सुधीर कदम या काव्यकारांच्याकडून त्यांना प्रेरणा मिळाली

काव्यक्षेत्रामध्ये –रानकवी यशवंत तांदळे नाघू महानेर इंद्रजीत भालेराव यांच्याकडून काव्यलेखनास प्रेरणा मिळाली

तसेच अर्थिक परिस्थीतीतून झुज देत त्यांनी त्या लेखन करुन झालेली कवी आहे. यांनाच बालकवी म्हणून ओळखले जाते याच कवीचा कधीकधी काव्य संग्रह प्रसिध्द आहे.

**८.तुमची वैयक्तीक माहिती व आवडता छंद कोणता ?**

निबंध लेखन, कवीता , कथा, बालनाटीका, वैचारीक लेखन लिहणे,सामाजीक कार्य किर्तन प्रवचन ऐकण तसेच बातम्या पाहणे समाज कार्य करणे व्यतरीक्त इतर खूप छंद आहे त्यांची सुध्दा आवड आहे.

**९. लेखनाची आवड केव्हा पासून लागली ?**

लेखनाची आवड १२ वर्षापासून लागली ७ वी ८वीत असताना असताना त्यांनी पहिली कवीता केली त्याकवीतेपासूनच त्यांनी लेखनास सुरवात केली तेव्हापासून ते आज अखेरपर्यंत त्या लेखन करतात

१०. कोणकोणत्या प्रसंगावर तुम्ही लेखन केले

पहिले लेखन त्यांनी आई या निबंधावर केले शाळेमध्ये गुरुजी शिकवत असताना निबंधाच्य माध्यमातून आई हि कवीता लिहली तीच कविता गुरजींना आवडली यावरुन त्यांना कविता करु आवडू लागले यातून त्यांनी पहिली कविता आई आवडू लागले

Scanned with CamScanner

**११.मुलाखतीचा उददेश चार ओळीत सांगू शकल का?**

आज जे तुम्ही करत आहात नवदित प्रतितया नवकवी जेष्ठ साहित्यक यांच्या घरी जावून समक्ष चर्चाव्दारे आपण जी मुलाखत घवून त्यांची इत्यमभूत माहिती आपण अणेक विदयार्थी वाचकांपर्यत पोचवत आहात ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे

**१२. तुमचा युवा पिढीला संदेश कोणता आहे ?**

आजच्या तरुन पिढीने वाचन संस्कृतीकडे पाहून वळले पाहिजे वाचन संस्कृती चळवळ राबवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे तरच उदयाची भावी पिढी मन— मेंदू मनगट याव्दारे सक्षम होईल.

१३. तुम्ही आत्तापर्य तुमच्याबददल आलेली वृत्तपत्रातील माहिती व काही लेख यांची कात्रणे दया.

Scanned with CamScanner

ाझी शाळा,
ाझा उपक्रम

# माझी दिनचर्या

आराधना गुरव
जि. प. प्राथ. शाळा तुपेवाडी, ता. खटाव, जि. सातारा.
भ्रमणध्वनी : ९०७५८२९५३४

*शिक्षण आनंददायी असले पाहिजे ही भूमिका असल्याने मुलांना शाळेची गोडी लावण्याचे, त्यांना शाळेत टिकविण्याचे आणि गुणवत्तावाढीचे आव्हान शिक्षकांसमोर आहे. यासाठी कल्पक उपक्रम, क्लृप्त्या यांचा आधार ते घेत आहेत. '१० ओळी शुद्धलेखन लिहा' या रुक्ष गृहपाठाऐवजी 'रोजचे अनुभव लिहा' असा गृहपाठ दिला आणि त्यातूनच 'माझी दिनचर्या' या उपक्रमाचा जन्म झाला. या उपक्रमाने मुले लिहिती झाली. त्यांच्यातला लेखक प्रकट होऊ लागला, त्या अनुभवाविषयी.*

शाळा टिकविण्याचे
गुणवत्ता वाढविण्याचे
सर्व शिक्षकांना पेलावे
े. पटसंख्या टिकवायची
. मुलांना शाळेत येताना
ला पाहिजे. शाळेची ओढ
ावण्याची गोडी लागली
ोडक्यात, शाळेत आनंद
ा आहे आणि गुणवत्ताही
ो आहे. त्यासाठी मग वेगवेगळ्या क्लृप्त्या, गमतीजमती
धार घ्यावा लागतो.

ानी शाळेत रमले पाहिजे आणि शिकलेही पाहिजे असे
उपक्रम शोधून ते आपल्याला वर्गात यशस्वी रीत्या
लागतात. आपण वर्गामध्ये अनेक उपक्रम घेतो.
न हा असाच एक उपक्रम. लेखन करताना चुका होऊ
ांचे हस्ताक्षर सुधारावे, म्हणून आपण मुलांना दररोज
१० ओळी शुद्धलेखन लिहा असे सांगतो. मग मुलेही
ील १० ओळी बघून कशातरी लिहितात. सुरुवातीला
स मुलांचा उत्साह असतो. मुले अक्षर वगैरे छान काढतात
ळू त्यांचा उत्साह मावळतो, कारण पुस्तकातले बघायचे,
उतरवायचे या गोष्टीचा त्यांना कंटाळा येऊ लागतो. या
न लिहिण्यामध्ये त्यांना नावीन्य काहीच वाटत नाही.
बुद्धीला जे खाद्य हवं ते या यांत्रिक प्रक्रियेतून मिळत
ावर उपाय तर शोधायलाच हवा होता आणि तो उपाय
शाळेतील मुलांनीच शोधला. ज्ञानरचनावाद म्हणतात तो
३ री व ४ थी ला 'आम्ही लिहितो' या शीर्षकाखाली
रोजच्या दिवसात येणारे अनुभव मुलांनी लिहायचे असा
ाहे, हा घटक शिकवून झाल्यावर इ. ४ थी ला शिकविणारे
ल ढगे सर यांनी त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शाळेतून
ावर त्यांनी काय काय केले ते लिहून आणायला सांगितले.
मची शाळा म्हणजे तुपेवाडी हे गाव. अगदी छोटेसे.
२० ते २५ घरे असणारे. त्यामुळे दोन-तीन घरांतील मुलं एकत्र मिळून अभ्यास करतात. इ. ३ री व ४ थीतील मुले सरांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी दिवसभरात काय काय केले ते लिहीत होती. ते बघून ५ वी च्या मुलांनीही त्याप्रमाणे लिहायला सुरुवात केली.

दुसऱ्या दिवशी प्रार्थना संपली. वर्गात गेल्यावर अभ्यास तपासताना मुलांनी काहीतरी वेगळं लिहिल्याचं जाणवलं. शुद्धलेखन होतंच पण त्या जोडीला एक पान भरून लिहिलेले त्यांचे अनुभव होते. मला त्या शुद्धलेखनापेक्षाही मुलांनी स्वतःहून लिहिलेले दुसरे लिखाण आवडले. कारण एकाच वर्गातील बहुसंख्य मुलांचे शुद्धलेखन सारखेच असते पण एकाच वर्गातील या मुलांनी एक पानभरून जे अनुभव लिहिले होते ते मात्र वेगवेगळे होते. प्रत्येकाची वाक्यरचना वेगळी, प्रत्येकाचे विचार वेगळे. यातूनच आम्हांला आमचा उपक्रम सापडला. मग आम्ही इ. २ री पासून ५ वी पर्यंत मुलांना शुद्धलेखन न लिहिता रोज एक पानभरून दिनचर्या लिहिण्यास सांगितली आणि एका नवीन उपक्रमाचा उदय झाला. 'माझी दिनचर्या'.

रोज आम्हांला लेखनाचे नवनवीन पैलू समजायला लागले. मी स्वतः लेखिका असल्यामुळे मलाही मुलांची दिनचर्या वाचण्याची गोडी वाटू लागली. मुलं आपापसात एकमेकांची दिनचर्या वाचू लागली. यातून त्यांची विचारक्षमता वाढली. स्मरणशक्तीचा विकास होऊ लागला. त्यांच्या मेंदूला खाद्य मिळाले. चिकित्सक वृत्तीचा विकास झाला. लेखनकला हळूहळू अवगत होऊ लागली. एकमेकांच्या वह्या वाचण्याने वाचनक्षमता सुधारली. सुरुवातीला लेखनात चुका व्हायच्या, बोली भाषेतील शब्द यायचे पण ते आम्ही सहजतेने स्वीकारले कारण आता कुठे मुले विचार करायला लागली होती. सुरुवातीला गोड बोलून, हसत खेळत एकमेकांना टाळ्या देत शुद्धलेखनाच्या चुका दुरुस्त केल्या. पुढे पुढे मग ही मुलंच एकमेकांचे गुरू बनली. एकमेकांचे शुद्धलेखन तपासू लागली आणि आमचा हेतू साध्य झाला.



चांगला स्वभाव हा गणितातील शून्यासारखा असतो, ज्याच्यासोबत तो असतो त्याची किंमत वाढते.


Scanned with CamScanner

री

# स्वामिनी

ऑक्टोबर २००५ (२)




…रं म्हणतात की संकटं माणसाला निर्भय बनवतात, …न एक दोन संकटांच्या बाबतीत ठीक आहे, पण …मागं एक अशी संकटांची मालिकाच सुरू होते …माणूस खरचं खूप खचतो. त्याचं अंतर्मन पोखरून …. अशा परिस्थितीत या संकटांच्या चक्रव्यूहात …लेला माणूस आपली सदसद्‌विवेकबुद्धी हरवून …. देवावर तुमचा कितीही विश्वास असो संकटांची …का एकदा सुरू झाली की तुमची ही श्रद्धाही …ळीत होते. अशा अडचणीच्या चक्रव्यूहात सापडणारी …रवाण्या घरातील विद्या असो, चार दिवस सासू चे… …ल अनुराधा असो, भाग्यविधातामधील तन्वी असो …या कसोटी…, कुमकुममधील प्रेरणा, कुमकुम असो ती …तेच, डळमळीत होतेच, खरंतर या प्रसंगी तिला गरज …ते मायेची, आधाराची पण तो आधारही तिला मिळत …. तरीही ती उभी असते. निर्धारानं लढत असते. प्रत्येक …ट ती सहन करते ते कशाच्या जोरावर? तर तिच्यात …णाऱ्या स्त्रीत्वाच्या जोरावर. तिच्यात असणाऱ्या …त्मविश्वासाच्या जोरावर.

परमेश्वरानं स्त्रीला घडवलं तेच मुळी सहनशीलतेची …गी देऊन. तिच्या अंगी असलेल्या या सहनशीलतेमुळेच …ाही संकटे येवोत प्रथमदर्शनी जरी ती डळमळली तरी ती …हा निश्चयानं उभा राहते. पुढं होऊन संसार सावरते.

स्त्रीचं खरं प्रेम असतं ते तिच्या संसारावर, आपलं घर, …आपला संसार, आपला पती, मुलं हेच तिचं खरं सर्वस्व …सतं. हे सगळं वाचवण्यासाठी ती अविरत धडपडत …सते. कधी ती रुद्रावतार धारण करते तर कधी शांत, शीतल …ांदण्याप्रमाणे मुक्त हस्ताने प्रेमाची बरसात करते. तिचा …ग जितका कडवट असतो तितकंच तिचं प्रेम खरं असते.

'रुसतेही ती
हसतेही ती
चिडतेही ती आणि मारतेही ती
सावरतेही तीच
आणि घडवतेही तीच
तिच्यामुळंच सगळं चालतं
ती आहे म्हणूनच घराचं घरपण टिकतं.'

स्त्री कितीही मोठी, उच्चपदस्थ होवो, तिचं मन मात्र आपल्या संसारातच गुरफटलेलं असतं. आपला हा संसार वाचवण्यासाठी टोकाचा निर्णय घेतलेली स्त्रीही मागे फिरते, पुन्हा नव्यानं संसाराची घडी बसवण्याचा प्रयत्न करते. आज २१व्या शतकातही स्त्री पूर्वी होती तशीच संसारप्रिय आहे. म्हणूनच आजही विवाहसंस्था टिकून आहे. याचं खरं श्रेय

संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक - प्रतापसिंह ग. जाधव,
'पुढारी भवन', २३१८सी, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.
फोन- २५४३१११, २, ३, ४, ५. फॅक्स- ०२३१ - २५४३१२४,५.
Email: kpr_pudharik@sancharnet.in
पी. आर. बी. कायद्यानुसार या पुरवणीत प्रसिद्ध होणाऱ्या सर्व मजकुराची जबाबदारी पुरवणीचे प्रमुख उपसंपादक श्रीराम ग. पचिंद्रे यांची राहील.

स्त्रीचं खरं प्रेम असतं ते तिच्या संसारावर, आपलं घर, आपला संसार, आपला पती, मुलं हेच तिचं खरं सर्वस्व असतं. हे सगळं वाचवण्यासाठी ती अविरत धडपडत असते. कधी ती रुद्रावतार धारण करते तर कधी शांत, शीतल चांदण्याप्रमाणे मुक्त हस्ताने प्रेमाची बरसात करते. तिचा राग जितका कडवट असतो तितकंच तिचं प्रेम खरं असतं.

कुणाला असेल तर या मातीतील प्रत्येक स्त्रीला.

स्त्री जन्माला येतानाच एक व्रत घेऊन येते आणि त्या व्रताचं ती आजन्म पालन करते.

'दुःखी साऱ्या भावना
आतल्या आत गिळायच्या
ओठात साखर घेऊन
फक्त गोड स्मृतीच जपायच्या.'

स्त्रीच्या या स्वभावामुळेच तर आजही समाजातील दुष्ट लोकांनी कितीही संकटे उभी केली तरी स्त्री निर्धारानं लढते आणि जिंकतेही. स्त्रीच्या या सहनशील वृत्तीमुळेच आज कितीतरी संसार टिकलेत, बहरलेत आणि पूर्णत्वाला पोहोचलेत.

'दृष्ट लागण्याजोगे सारे
गालबोटही कुठे नसे
जग दोघांचे असेल सुखी
स्वर्ग त्यापुढे फिका पडे.'

हे संसाराचं स्वप्न आज साकारलेलं दिसतंय. गरज आहे ती केवळ खंबीर साथीची, जी साथ तिला केवळ तिचा पतीच देऊ शकतो संसार पुढं नेण्यासाठी आणि स्वर्गाहून रमणीय करण्यासाठी. मग काय तुमच्या स्वामिनीला साथ देणार ना?

-सौ. गुरव आराधना

मला दिले.

'मला तुम्ही का विसरलात? मी ६, ८वीत गेलो म्हणून तुम्ही मला बँडपथकातूनही काढले. असे 'कामापुरता मामा' सारखे आपण का वागता?'

असे पत्रातून परखडपणे विचारले. मला त्याचा मुळीच राग आला नाही. उलट योग्य ठिकाणी योग्य म्हणीचा वापर माझ्या मुलांना करता येतो, असा सकारात्मक आनंद मला झाला. मी खरंच असा अन्याय केलाय का? मी माझ्यात डोकावून पाहिले. मुलांनी करून दिलेली शिक्षकांच्या चुकांची जाणीव शिक्षकांना सहज होते का? पण असाही विषय हसत-खेळत सहजतेने हाताळता येतो. पत्रलेखनाच्या उपक्रमामुळे मला मुलांच्या अधिक जवळ जाता आले. अनेकांच्या मनच्या अडचणी माझ्यासमोर आल्या. आई नसणाऱ्या, बाहेरगावी वसतिगृहात शिकणाऱ्या, काही शारीरिक दुखणी असणाऱ्या मुलांकडे मी जाणीवपूर्वक वळले. त्यांना अतिशय जिव्हाळ्याने जपले. पाठीवर थाप देऊन योग्य गोष्टीत त्यांचे कौतुक केले.

म्हणूनच माझ्या शिक्षकी पेशाचा मला अभिमान वाटतो.

***

## सावित्रीच्या मुली



सावित्रीच्या मुली आम्ही
मागे कधी हटणार नाही
लाख संकटे येवोत जीवनी
जिद्द आम्ही सोडणार नाही।।



कणाकणाने ज्ञान मिळवू
तिळातिळाने प्रगती करू
शिखर यशाचे गाठताना
कधीच मागे पडणार नाही॥

ध्येयाने आम्ही प्रेरित होऊ
निर्धाराने अखंड चालू
सावित्रीचा वसा चालवताना
कधीच आम्ही थकणार नाही॥

सौ. आराधना संतोष गुरव
विद्यामंदिर नृसिंहवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

मला दिले.

'मला तुम्ही का विसरलात?' मी इ. [illegible]ीत गेलो म्हणून तुम्ही मला वर्गशिक्षकातूनही वगळले. असे 'कामापुरता मामा' सारखे आपण का वागता?'

असे पत्रातून परखडपणे विचारले. मला त्याचा मुळीच राग आला नाही. उलट योग्य ठिकाणी योग्य म्हणींचा वापर माझ्या मुलांना करता येतो, असा सकारात्मक आनंद मला झाला. मी खरंच असा अन्याय केलाय का? मी माझ्यात डोकावून पाहिले. मुलांनी करून दिलेली शिक्षकांच्या चुकांची जाणीव शिक्षकांना सहन होते का? पण असाही विषय हसत-खेळत सहजतेने हाताळता येतो. पत्रलेखनाच्या उपक्रमामुळे मला मुलांच्या अधिक जवळ जाता आले. अनेकांच्या घरच्या अडचणी माझ्यासमोर आल्या. आई नसणाऱ्या, बाहेरगावी वसतिगृहात शिकणाऱ्या, काही शारीरिक दुखणी असणाऱ्या मुलांकडे मी जाणीवपूर्वक वळले. त्यांना अतिशय जिव्हाळ्याने जपले. पाठीवर थाप देऊन योग्य गोष्टीत त्यांचे कौतुक केले.

म्हणूनच माझ्या शिक्षकी पेशाचा मला अभिमान वाटतो.

***

## सावित्रीच्या मुली



सावित्रीच्या मुली आम्ही
मागे कधी हटणार नाही
लाख संकटे येवोत जीवनी
जिद्द आम्ही सोडणार नाही।।



कणाकणाने ज्ञान मिळवू
तिळातिळाने प्रगती करू
शिखर यशाचे गाठताना
कधीच कमी पडणार नाही।।

ध्येयाने आम्ही प्रेरित होऊ
निर्धाराने अखंड चालू
सावित्रीचा वसा चालवताना
कधीच आम्ही थकणार नाही।।

सौ. आराधना संतोष गुरव
विद्यामंदिर नृसिंहवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

# जगायचे ते दुसऱ्यासाठी

*Life is to give, not to take* या तत्त्वाप्रमाणं मुक्त हस्तानं फक्त देत राहा. जीवनात जगताना नेहमी सूर्याचा आदर्श नजरेसमोर ठेवा, कारण तो स्वतःला जाळून जगाला प्रकाश देतो. देणं हेच जीवनाचं ध्येय ठेवा.

आराधना गुरव, पडूळ

जीवनाच्या या वाटेवर अनेक लोक भेटतात. काही मित्र असतात, तर काही शत्रू असतात. काही जण आपल्याशी आपल्या हृदयाशी स्पंदनाइतके एकरूप होतात. मग त्या व्यक्ती जवळ असोत वा नसोत. त्यांच्या सहवासातील मधुर आठवणी मनामध्ये सतत रुंजी घालत असतात. ज्याप्रमाणे हिरव्यागार हिरवळीतून जाताना अचानक सापाचं दर्शन व्हावं किंवा काट्याने पाय रक्तबंबाळ व्हावा असे काही निष्ठुर आपणास भेटतात.

सहवासातून प्रेम निर्माण होते, ही म्हणून तितकीशी खरी नाही. आपण आपली अल्पशा सहवासातून एखाद्यावर जिवापाड प्रेम करू शकतो. पण त्या व्यक्तीचे मन जाणून घेण्याचा, ती व्यक्तीही आपल्यावर तेवढेच प्रेम करते का याचा प्रयत्न कधी

विचार करीत नाही. तो व्यक्तीही आपल्यावर प्रेम करतोच असेच समजून आपण तिच्यात गुंतत जातो. मग जर त्या व्यक्तीने आपल्याला दूर लोटल्यावर मनाला जे दुःख होते त्यातून काहीजण आयुष्य नष्ट करतात.

अशा लोकांना मला तरी सांगावसं वाटतं, की प्रेम म्हणजे शक्ती असेल, प्रेम म्हणजे जीवनाच्या निर्जन वाळवंटातील झरा असेल पण तरीही प्रेम म्हणजे सर्वस्व नाही. प्रेमापेक्षाही इतर अनेक गोष्टी महत्त्वाच्या आहेत. जीवनाचा हा संघर्ष खंबीर मनाने लढणे हाच पुरुषार्थ आहे. एखाने साथ सोडली म्हणून आपला तोल नक्कीच जाणार नाही. शेवटी संकटं मानवावर येतात तो कशासाठी? त्यानं काही तरी नवीन शिकावं यासाठीच ना? मग या जीवनातील अनुभवांपासून सतत

शिकत राहा. खिलाडूवृत्तीने जीवनाच्या संकटांना, आव्हानांना सामोरे जा. विजय तुमचाच असेल!

एक भाषा फुलाला, शंभर पुरी दुःखाचे असे असले तरी मानवी जीवनाचे वस्त्र जरतारी आहे, हे विसरून चालणार नाही. सत्याशी दोन हात करण्यात खरी मौज असते. दुःखाच्या स्पर्शाने सुख उजळते. अगदी परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचेही सोनं व्हावं तसं! (तुम्हाला त्रास देणाऱ्या, तुम्हाला फसवणाऱ्या, तुमच्यावर नाटकी प्रेम, माया करणाऱ्या लोकांमुळेही तुमचा उत्कर्ष होऊ शकतो.) त्यांच्यामुळे जीवनातील फसव्या लोकांचं तत्त्वज्ञान आत्मसात करण्याची क्षमता तुमच्यात निर्माण होऊ शकते. म्हणून जीवनाला हसतमुखानं सामोरे जा. येणारा प्रत्येक क्षण आपल्यासाठी काहीतरी नवीन

...आपल्याला एक दिशा ...
...यशाचा मार्ग दिसतो ...

*Life is to give, not to take* तत्त्वाप्रमाणे मुक्त हस्तानं देत राहा. जीवनात जगताना सूर्याचा आदर्श नजरेसमोर ठेवा, कारण तो स्वतःला जाळून प्रकाश देतो. देणं हेच जीवनाचं ध्येय ठेवा. तुम्हाला मदत ... आणि तुम्हाला ... प्रेम द्या. तुम्ही फक्त देत राहा. तुम्ही दिलेलं घेता घेताच त्याला घेण्याची लाज वाटेल. देण्यातलं सुख प्राप्त करण्यास देत राहील.

स्वतःचं दुःख विसरा. फसवणारे, दुखवणारे कोणे समजून ज्यांना तुमची खरी गरज आहे त्या दीन-दलितांना आपलंसं करा. त्यांना प्रेम ...

"जीवनात एकच मार्ग जगायचे ते दुसऱ्यासाठी ..." या न्यायाने तुम्ही इतरांकडून काहीही अपेक्षा न ठेवता ओंजळभरून तुमच्याजवळ आहे ते इतरांना वाटत राहा. जीवन किती सुंदर वाटू लागेल. शेवटी स्वतःसाठी जगू ... इतरांसाठी मरणाही ... मालाच तर खरं जीवन ...

... प्रत्यक्ष ... जे आहे ते ... जीवन ... तर ... आहेत ... जीवनात ... त्याचे ... म्हणून ... दिलेले ... आनंद ... नाही ... राहायचं आहे.

... सुखी ... दुःखी ... असा ... कोणताही ... नसतो. सतत सुख किंवा सतत दुःख कुणालाही मिळत नाही. शेवटी सुखदुःखं हेदेखील मनावर आहे. ज्याचे त्याचे व्यक्तिगत अर्थ-अर्थ लावलेले असतात. त्यातील एक जण मला, अर्थ प्रेम, हिरावून आहे म्हणून दुःख करत बसेल तर कदाचित दुसरा नाही. अर्थ प्रेम करतोच आहे म्हणून आनंदी होईल. शेवटी काय तर सुख-दुःख या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकाचे सुख, दुसऱ्याचे दुःख असू शकतं.

जीवन हा एक लढाई आहे. या लढाईत प्रत्येक जण योद्धा असतो. तेव्हा हार-जीत होणारच. या लढाईत उतरणारा प्रत्येक जण काहीतरी ध्येय घेऊनच उतरत असतो. कुणाला ते ध्येय लवकर साध्य होते, तर कुणाला उशिरा. परंतु अखेरपर्यंत मी हे मिळविणारच असा निश्चय करून सतत प्रयत्न करणारा यशस्वी होतो. म्हणून आपण फक्त प्रयत्न करत राहायचं, न थकता, न दमता.

२४ मे २००१ युवा ५

दैनिक "पुढारी" आपल

# उत्स्फूर्त

## कधी कधी वाटतं...

कधी कधी वाटतं...
मेघ बनावं
मुसळधार श्रावण सरींसह
धरतीवर कोसळावं
तृप्त करावं या धरतीला
पाजावं अमृत वनराईला
स्वैर उच्छाद मांडावा डोंगरावर
नाचत गात यावं खाली कड्यांवरून
पुसावेत अश्रू बळीराजाचे
स्वतःच्या श्रावणसरींनी
खुलावावं त्याचं मुख
पावसाच्या टपोऱ्या थेंबांनी
दूर करावी त्याची प्रतिक्षा
अटकून द्यावी त्यानं निराशा

का नाही येत तो पाऊस बनून धरतीवर?
का नाही कळत त्याला
त्याच्या लेकराची व्यथा?
का नाही दिसत त्याला
आकाशाकडे डोळे लावून बसलेले जीव?
का नाही दिसत त्याला
चातकाप्रमाणे पावसाच्या थेंबांची
वाट पाहणारी धरती?
का सगळं दिसूनही वागतोय तो
अनोळख्यासारखा?
सगळे नुसते प्रश्न अन् प्रश्न
कोणी देऊ शकेल या प्रश्नांची उत्तरं
नाही..... कुणीच नाही
कारण हे प्रश्न निर्माण केलेत

...भाषेतील शब्द मुले सहजतेने वापरत होती. पण रोज ...णतले तेच तेच शब्द वाचणे, अवघड बोलणे, लिहिणे ...मुलांनी लिहिलेल्या मेवा, चावी, लय, शेरडी, बारकं ...या, वाईल, नरडं त्वांड, कपाटाव, म्हशीच्या, पुरगी, ...अळ्याल, टिपाव इत्यादी शब्द वाचताना एक प्रकारचा ...ला आणि मजा वाटत होती. कधी कधी मजा म्हणून ...आमच्याही फळ्यावर याच भाषेत लिहू लागलो. मुलांचे आणि ...नाते अधिकच दृढ बनत गेले.

...आता माझ्या शाळेतील मुलांना पुस्तकातील बघून लिहावे ...नाही, कारण ती विचार करायला लागली आहेत. मनातल्या ...बोलायला लागली आहेत. बऱ्याच मुलांनी त्यांच्या ...आई कामावर जाताना चावी कुठे दडवते, तर मोरीत ...च्या डब्याखाली, दरवाजाच्या वरच्या फळीवर, तुळशीच्या ...अशी गुपितेही लेखनातून सांगितली. तीन शब्द द्या, ...द्या, आमची गोष्ट लगेच तयार होते. कुमठे बीटप्रमाणे ...नाहीत आमची मुलं! पण आता कुठे सुरुवात आहे. ...ला लेखक हळूहळू बाहेर डोकवायला लागला आहे. ही ...हळू नक्कीच तयार होतील.

...लेखन हे साध्य नसून साधन आहे याचा प्रत्यय या 'माझी ... उपक्रमाच्या निमित्ताने आला. आमची मुले आणि आम्ही शिक्षक यांच्यात एक अदृश्य असा ऋणानुबंध निर्माण झाला. मुलांच्या दिनचर्येत सरांच्या गाडीपासून मॅडमच्या साडी पर्यंतचे वर्णन वाचायला मिळाले. काहीजणींच्या स्वप्नात मॅडम आल्या. मुलांच्या स्वप्नात जाण्यापर्यंत आपण मुलांशी एकरूप झालो आहोत हे जाणवले आणि मन तृप्त झाले. मी स्वतः एक कवयित्री असल्याने माझ्या लेखणीतून आपसूकच शब्द उमटले,

इवल्या इवल्या मनांची, इवली इवली स्वप्ने
इवल्या इवल्या स्वप्नांना, आभाळ वाटावे आपले
इवल्या इवल्या पावलांनी, घ्यावी उंच भरारी
अन् घ्यावे अलगद हाती
स्वप्नांचे आभाळ अवघे, उघडावेत त्यांनी डोळे
स्वप्न सत्यात उतरताना पाहण्यासाठी
उघडी व्हावीत सगळी दारे, यशाने त्यांना कवेत घेण्यासाठी.

ज्ञानरचनावादातून विद्यार्थ्यांनीच शोधून काढलेल्या या अनोख्या उपक्रमामुळे आमची शाळा लिहायला लागली. भाषा विकासाच्या समृद्धीच्या दिशेने आता आमची पावलं पुढं पुढं पडायला लागली आहेत. माझा लेखनाचा वारसा आज माझ्या शाळेतील मुले चालवायला लागली आहेत आणि या गोष्टीचा आम्हांला सार्थ अभिमान वाटतो.

◈◈◈

(...३ वरून)

...जेवणाची व्यवस्था आणि मंडप व स्पीकर व्यवस्था ...तसेच या शिबिराच्या यशस्वितेत ज्यांचा सिंहाचा वाटा ...त्या माझगाव डॉक व कर्वे समाजसेवी संस्थेच्या सर्व ...यांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत.

...या संपूर्ण शिबिरासाठी उपसरपंच संजय विशे, शाळा ...व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष पडवळ, शिक्षण विस्तार ...अधिकारी रोहिणी क्षीरसागर, पडवळपाडा केंद्रप्रमुख पाटील, ...केंद्रप्रमुख प्रतिभा गायकवाड, मठाधिपती, सर्व ...शिक्षक वर्ग व विद्यार्थी मित्रांचे मोलाचे सहकार्य लागले.

सहकार्य करण्याची वृत्ती, जबाबदारीची जाणीव व ...नेतृत्वगुण यांना वाव देणारा हा उपक्रम सर्व विद्यार्थ्यांना भावी ...काळासाठी प्रेरणादायी ठरला.

◈◈◈

## शब्दसंपत्ती वाढवा

(एप्रिल २०१८ चे उत्तर)

१) ज्ञान
२) वादन
३) रचना
४) वा
५) वाद
६) रवा
७) नर
८) नार
९) रव
१०) नारद
११) नाच
१२) दर
१३) नाद
१४) नावा
१५) दार
१६) वाचन
१७) वाच
१८) रचनावाद
१९) दानवा
२०) नाना
२१) वानर
२२) रद
२३) चर
२४) नवार
२५) नच
२६) नद



Scanned with CamScanner